**महाराष्ट्र शासन**
सहसंचालक (उच्च शिक्षण)
१७ आंबेडकर रोड, कॅम्प, पुणे – ४११ ००१
Website: www.jdhepune.org E-mail – jdhepune@gmail.com

दूरध्वनी क्रमांक – ०२० - २६१२७८३३, ०२०-२६०५१६३२ फॅक्स क्र. ०२०- २६०५१६३२

क्रमांक - समूह विद्यापीठ कार्यशाळा-२०२३ पुणे विभाग/13485 दि. २३/११/२०२३

प्रति,

१. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

२. प्राचार्य / प्राचार्या,
सोबत जोडलेल्या यादीतील महाविद्यालये,
**पुणे / अहमदनगर व नाशिक जिल्हे.**

विषय - **एकदिवसीय राज्यस्तरीय समूह विद्यापीठ स्थापने संदर्भात दिनांक २९ नोव्हेंबर, २०२३ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे आयोजित कार्यशाळेसाठी संस्थाचालक व प्राचार्य उपस्थित राहणेबाबत..**

संदर्भ - मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, म.रा. पुणे यांचे पत्र क्र. युएनआय/समूह विद्यापीठ कार्यशाळा/२०२३/विशि-१ दिनांक २३.११.२०२३.

संदर्भित पत्राच्या विषयान्वये कळविण्यात येते की, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या शिफारशीनुसार समूह विद्यापीठे स्थापन करण्याबाबत शासनाने दिनांक १७.११.२०२३ रोजी झालेल्या मा. मंत्रीमंडळ बैठकीत निर्णय घेतला असून समूह विद्यापीठाबाबतच्या मार्गदर्शक सूचना सर्व संबंधित घटकांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे.

या अनुषंगाने उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या वतीने राज्यातील संबंधित संस्थाचालक व त्यांचे प्राचार्य यांची कार्यशाळा **सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे संत ज्ञानेश्वर सभागृह, मुख्य इमारत येथे दिनांक २९.११.२०२३ रोजी सकाळी ११.०० ते २.०० या कालावधीत आयोजित करण्यात आलेली आहे.**

सदर कार्यशाळेसाठी मा.ना. श्री. चंद्रकांतदादा पाटील मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य हे अध्यक्ष म्हणून उपस्थित राहणार असून मा. श्री. विकासचंद्र रस्तोगी, मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

सदर कार्यशाळेसाठी सोबतच्या यादीतील महाविद्यालये तसेच इतर महाविद्यालये समूह विद्यापीठ स्थापन करु इच्छिणा-या, तसेच समूह विद्यापीठ स्थापने संदर्भात माहिती जाणून घेण्यासाठी इच्छूक असणारे संस्थाचालक व त्यांचे प्राचार्य प्रतिनिधी यांनी सदर कार्यशाळेसाठी उपस्थित रहावे.

तसेच या कार्यशाळेसाठी उपस्थित राहणारे संस्थाचालक व प्राचार्य प्रतिनिधी यांची माहिती खालील तक्त्यात आजच या कार्यालयाकडे jdhepuneinfo@gmail.com या मेलवर पाठविण्यात यावी.

| अ.क्र. | संस्थाचालकांचे नांव व प्राचार्य प्रतिनिधींचे नांव | पदनाम | भ्रमणध्वनी क्रमांक | शेरा |
|---|---|---|---|---|
| | | | | |

(डॉ. केशव तुपे )
सह संचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे.